## महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,

**मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१.**

# जाहीर प्रकटन,

## इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२५-२६

शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे. यावर्षी संपूर्ण राज्यात इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश सर्वप्रथम करण्यात येत आहेत. यामध्ये एकूण ९४३५ कनिष्ठ महाविद्यालयांच्या एकूण १९३२४ शाखा प्रकार व अनुदान प्रकार निहाय तुकडया संख्या आहेत. कॅप प्रथम फेरी **अंतर्गत दिनांक २८ जून २०२५ रोजी यादया घोषित करण्यात आलेल्या आहेत.**

**अ) एकूण प्रवेश क्षमतेच्या १००% विद्यार्थी अलॉटमेंट झालेल्या एकूण शाखांची संख्या २९ आहेत.**

ब) प्रवेश क्षमतेच्या ८०% ते ९९% विद्यार्थी अलॉटमेंट झालेल्या शाखांची संख्या २४८९ आहे.

क) प्रवेश क्षमतेच्या ६०% ते ७९% विद्यार्थी अलॉटमेंट झालेल्या शाखांची संख्या १८८८ आहे.

ड) प्रवेश क्षमतेच्या ४०% ते ५९% विद्यार्थी अलॉटमेंट झालेल्या शाखांची संख्या ३५०५ आहे.

इ) प्रवेश क्षमतेच्या १% ते ३९% विद्यार्थी अलॉटमेंट झालेल्या शाखांची संख्या १०२७८ आहे.

कनिष्ठ महाविद्यालयांच्या ९०२० शाखांमध्ये त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश अर्ज आलेले आहेत. उर्वरित १०३०४ शाखांमध्ये प्रवेश क्षमतेपेक्षा कमी अर्ज आलेले आहेत.

दिनांक ०१/०७/२०२५ पर्यंत नियमित फेरी एक मध्ये विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रवेश निश्चित केलेले आहेत. त्यामध्ये कॅप फेरीसाठी एकूण १४३०८४ इतके प्रवेश झालेले आहेत. तसेच कोटामध्ये (व्यवस्थापन कोटा, संस्थाअंतर्गत कोटा, अल्पसंख्यांक कोटा) ६७१५२ इतके प्रवेश झालेले आहेत. आजपर्यंत एकूण प्रवेश २१०२३६ इतके झालेले आहेत. त्यांचा विभागनिहाय तपशील खाली तक्त्यात नमूदप्रमाणेः-

| अनु.क्र | विभाग | कॅप प्रवेश | कोटा प्रवेश | एकूण प्रवेश |
|---|---|---|---|---|
| १. | अमरावती | १६०५९ | ८७५९ | २४८१८ |
| २. | छ. संभाजीनगर | १५०६९ | ७१२४ | २२१९३ |
| ३. | कोल्हापूर | १३८१४ | ५५६६ | १९३८० |
| ४. | लातूर | ८०७९ | ३२०१ | ११२८० |
| ५. | मुंबई | २२२९० | १६५१८ | ३८८०८ |
| ६. | नागपूर | २०७४७ | ५९९९ | २६७४६ |
| ७. | नाशिक | १९९१४ | ८२७८ | २८१९२ |
| ८. | पुणे | २७११२ | ११७०७ | ३८८१९ |
| | **एकूण** | **१४३०८४** | **६७१५२** | **२१०२३६** |

**कनिष्ठ महाविद्यालयात प्रत्यक्ष विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित करावयाची अंतिम दिनांक ०७ जुलै, २०२५ आहे.**

इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेशासाठी नवीन विद्यार्थी नोंदणी व अर्जचा भाग-१ भरणे. नियमित फेरी -१ मध्ये नोंदणी अपूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अर्जाचा भाग-१ भरण्याची सुविधा संकेतस्थळावर दिनांक ०२ जुलै, २०२५ पासून सकाळी १०.०० ते दिनांक ०७ जुलै, २०२५ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कालावधी देण्यात येत आहे. नियमित फेरी -२ मधील अर्जाचा भाग-२ पसंतीक्रम देण्याची सुविधा दिनांक १० जुलै, २०२५ ते दिनांक १३ जुलै, २०२५ पर्यंत कालावधी देण्यात येणार आहे.

ज्या कनिष्ठ महाविद्यालयांना नोंदणी करावयाची आहे. त्यांच्याकरीता संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक स्तरावर दिनांक ०२ जुलै, २०२५ पासून सकाळी १०.०० ते दिनांक ०७ जुलै २०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कालावधी देण्यात येत आहे.

विद्यार्थी/पालक तसेच कनिष्ठ महाविद्यलयातील प्राचार्य यांनी याची नोंद घ्यावी. या बाबीची व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी. ही विनंती.

**अधिकृत पोर्टल-** https://mahafyjcadmissions.in

**ई-मेल आयडी** – support@mahafyjcadmissions.in

**हेल्पलाईन नंबर - ८५३०९५५५६४.**

**(डॉ. महेश पालकर)**
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

**स्थळः** पुणे
**दिनांकः** ०१ जुलै, २०२५